RNI No: MAHMAR/2004/13776 ✸ Postal Registration No: MH / MR / NW-35 / 2014-2016
Published On:12 June 2015 ✸ Posted at Kandivli(W) Post Office, Mumbai on 15 June, 2015

अजायब ✵ बानी

मराठी मासिक पत्रिका

वर्ष : बारा | अंक : बारा | जून २०१५

अनमोल वचन (संदेश) 4

पवित्र (संदेश) 9

खरी मशीद (सत्संग) 15

प्रश्नोत्तरे 29

मालक, मुद्रक व प्रकाशक श्री दामोदर सिनकर व संपादक श्रीमती रेवती सिनकर यांनी अजायब बानी हे मराठी मासिक नवरंग ऑफसेट 125, वडाला उद्योग भवन, मुंबई - 400031 येथे छापून सी/503 म्हात्रे प्लाझा, महात्मा गांधी रोड, डहाणूकर वाडी, कांदिवली (पश्चिम), मुंबई - 400067 फोन नं: (022) 24965000 येथून प्रसिद्ध केले.



अनमोल वचन

परम संत अजायब सिंह महाराजांनी सत्संगाच्या कार्यक्रमा अखेरीस संगतला दिलेला संदेश – ११ जून १९७७

ज्या आत्म्यांना नामासाठी परमात्म्याने प्रेरीत केले आहे ते जीव अतिशय भाग्यशाली आहेत. त्या आत्म्यांना नामासाठी प्रेरीत करणे ही परमात्म्याची कृपाच आहे. परमात्म्याच्या प्रेरणेनेच आपण एखाद्या महात्म्यांच्या संगत–सोबतीत जातो. महात्मा आपल्या घरातच जन्माला येवोत अथवा आपल्या शेजारी राहत असोत, आपल्यावर जर परमात्म्याची कृपादृष्टी नसेल, तर आपला त्या महात्म्यांवर विश्वास बसत नाही, हे एक त्रिवार सत्य आहे!

ही आपल्यावर परमात्म्याची खास कृपा आहे की, त्याने कृपालजींचे रूप धारण करून खूप दूर–दूरवर जाऊन आत्म्यांचा उद्धार केला आणि त्यांनी स्वत:बद्दल आपणांस माहिती दिली की मी तुमच्या शरीरामध्ये वास करीत आहे. तुम्ही जर मला भेटू इच्छित असाल, तर कशा तऱ्हेने मला भेटू शकता! गुरू नानक साहेब सांगतात:

धन धन कुल धन धन जननी जिन गुरु जणया माए।

धन्य ते कुळ, ज्या कुळामध्ये असे महान सत्पुरुष जन्म घेतात. धन्य ती माता जिने अशा सुपुत्रास जन्म दिला. ते सतगुरूदेखील धन्य आहेत, ज्यांनी जगातील इतर सामान्य जनांप्रमाणे वेळ वाया न घालविता नामाची कमाई केली. त्यांनी नामाची कमाई केल्याचा काय फायदा झाला? सर्वप्रथम त्यांनी स्वत:चा उद्धार केला, मग त्यांना परमात्म्याकडून असे बक्षिस मिळाले की जो कोणी त्यांच्याकडे प्रेम–आदराने पाहतो, त्याचादेखील उद्धार होतो.

आपल्या आत्म्यावर मनाचा आडपडदा असून मनावर मायेचा आडपडदा आहे. मन इंद्रियांसमोर विवश असते. त्याचप्रमाणे मनाच्या आधीन असल्याने

आपला आत्मादेखील विवश आहे. ब्रह्म वा त्रिकुटी हे मनाचे वास्तव्यस्थान आहे. परंतु आपले वास्तव्यस्थान त्यागून मन विषय–विकाररूपी जंगलामध्ये एखाद्या वेड्याप्रमाणे भरकटत आहे. येथे त्यास कोणत्याही प्रकारची सुख–शांती लाभत नाही.

काळाने आपल्या एका पायाच्या अंगठ्यावर उभे राहून एकदा सत्तर युगे तर दुसऱ्यांदा चौसष्ठ युगे सत्पुरुषाची भक्ती केली. त्या काळाच्या भक्तीवर सत्पुरुष प्रसन्न झाला व त्याने काळास विचारले, ''बोल! तुला काय हवे आहे?'' काळ सत्पुरुषास म्हणाला, तू केलेल्या विश्वाची संरचना मला पटत नाही. तू मला एखादे असे द्विप(देश) दे, जेथे माझ्या आदेशाचे पालन होईल. मी माझ्या मर्जीने एखाद्या व्यक्तीस तप्त तव्यावर बसवीन, एखाद्यास फाशीवर लटकवीन; तेथे मला कोणी जाब विचारणारा नसेल.'' त्यावर सत्पुरुषाने आत्म्यांना काळाच्या स्वाधीन केले. तेव्हा अनेक आत्मे सत्पुरुषाची विनवणी करीत विलाप करू लागले की, आपण आम्हांस याच्या स्वाधीन करीत आहात, परंतु याने जर आम्हांस त्रास, वेदना दिल्या तर आमची सुटका करवून घेण्याचा काही उपाय असावयास हवा.

त्यावर सत्पुरुषाने आत्म्यांना वचन दिले की मी प्रेमवश होऊन तुम्हाला काळाच्या स्वाधीन केले असल्याने तुम्ही माझ्या वचनांचे पालन करा. मी काळास एक अट घातली आहे की तो तुम्हांस एकदा तरी मनुष्यजन्म नक्कीच देईल. काळाने जर तुम्हांस त्रास दिला व जगापासून दूर होऊन तुम्ही मला हाक मारल्यास मी मनुष्यजन्म धारण करून तुम्हांस नेण्यासाठी नक्कीच येईन. ज्यांच्या हृदयात माझ्या भेटीसाठी तळमळ असेल, ते माझ्या समीप येतील. त्यांच्या हातास पकडून मी तेथून घेऊन जाईन. ज्यांना जग प्रिय वाटत असेल, ते माझे वचन ऐकणार नाहीत. माझ्याकडे पाहण्यासही ते राजी नसतील. त्यामुळे सत्पुरुष आपल्या वचनामध्ये बद्ध असल्याने, तो आपल्यासमान शरीर धारण करून आपल्यामध्ये राहतो.

कबीर साहेबांनी अनुराग सागर*पुस्तकात काळ व दयाल यांच्या रहस्या बद्दल खूप विस्तृतपणे लिहीले आहे. कबीर साहेब हे चारही युगांमध्ये येणारे पहिले संत होते. काळाने त्यांच्याशी खूप भयानक संघर्ष केला, त्यांना खूप त्रास देत राहिला. काळ कबीर साहेबांना म्हणत असे,''सत्पुरुषाने माझ्यावर प्रसन्न होऊन मला हे राज्य दिले आहे. तू माझा ज्येष्ठ बंधु असून, तू देखील मला एखादा वर दे.'' कबीर साहेब म्हणाले, ''अन्यायी काळा! मी तुझे सांगणे ऐकणार नाही, कारण तू लोकांवर खूप अत्याचार करतोस. जे आत्मे माझं ऐकतील त्यांना मी नक्कीच परमात्म्याच्या देशात घेऊन जाईन.''

काळ कबीरसाहेबांना म्हणाला,''तू लोकांना सांगशील की मद्य-मांसाचे सेवन त्यागा, वाईट कर्मं करण्याचे सोडून द्या, तरच मी तुम्हांस परमात्म्याच्या देशात घेऊन जाईन परंतु मी तर जगात जाहीर संदेश देईन की मद्य-मांसांचे सेवन करा. केवळ पुरुषच नाही तर स्त्रीयांनादेखील मद्य-मांस प्राशन करावयास मी लावीन. मी घरोघरी लोकांमध्ये भ्रम निर्माण करीन, लोकांमध्ये असा प्रचार करीन की तुम्ही मद्य-मांसाशिवाय जगूच शकणार नाही. तुझी भक्ती करणे अवघड असल्याने तुझे सांगणे कोण ऐकेल?''

ज्याप्रमाणे भटक्या जमातीपैकी एखाद्याने कुणा मुलाचे अपहरण केल्यास, त्या मुलाचे वडील मुलाचा शोध घेत त्या भटक्या जमातीमधील लोकांप्रमाणे वेष परिधान करून त्यांच्या मध्येच राहू लागतात. ते वडील दररोज मुलास समजावतात, परंतु मुलगा वडिलांना ओळखत नाही. वडिलांची इच्छा असते की, काहीही करून मुलाने त्यांचे सांगणे ऐकावे, जेणे करून मी त्यास सच्चखण्ड दाखवावा, त्यास समजवावे, तू या भटक्या लोकांसोबत कधी कोठे तर कधी कोठे झोपडे बांधून राहत आहेस. कधी कोठे तर कधी कोठे जन्म घेत आहेस. दररोजच्या संगतीमुळे मुलाच्या अंतरात त्याच्या घराची आठवण जागृत होते. त्या मुलाचे वडील मुलास समजावत त्याच्या घरी सच्चखण्डात घेऊन जातात. गुरू नानकदेवजी सांगतात:

* प्रेमाचा सागर



जिन तुम भेजे तिने बुलाए सुख सहज सेती घर आओ।

प्रियजनहों! ज्या परमेश्वराने तुम्हांस या जगामध्ये पाठविले आहे, तो परमेश्वर आमच्या मार्फत तुम्हांस पुन्हा माघारी बोलावत आहे. या! आम्ही तुम्हांस तुमच्या घरी घेऊन जातो. गुरू रामदासजी सांगतात:

संतों सुनो सुनो जन भाई गुरु काढे बाँह कुकीजे।
जे आत्मा को सुख नित लोड़े सतगुरू शरण पवीजे।।

आपण सांगत आहात, ''सतगुरूरूपी शक्ती या जगात येऊन एखाद्या नाविकाप्रमाणे सर्वांना हाक मारीत आहे. ज्याप्रमाणे नाविक आपली नाव नदी किनारी उभी करून लोकांना आवाज देतो की ज्या कुणास नदीच्या पलिकडील किनाऱ्यावर जायचे आहे, त्याने या नावेमध्ये येऊन बसावे. जे त्या नावेत बसतात, ते नदीच्या पलिकडच्या किनाऱ्यावर जाऊन आपला प्रवास पूर्ण करतात व जे विचार करीत राहतात, ते तेथेच मागे राहतात.''

सतगुरू शक्ती नाविकाप्रमाणे हात वर करून सांगतात, ''प्रियजनहो! तुम्ही जर तुमच्या आत्म्यासाठी सुख-शांतीचा शोध करीत असाल, तर तुम्ही एखाद्या महात्म्यास शरण जा.''

***

पवित्र

परमसंत अजायब सिंहजी महाराजांद्वारे कार्यक्रमा अखेरीस संगतसाठी
एक महत्वपूर्ण संदेश, मुंबई, महाराष्ट्र – २३ जानेवारी, १९८१

आपले मन विषय–विकाररूपी चिखलाने बरबटलेले आहे. चिखलात बरबटल्याने आपले शरीर मलीन होते. आपले शरीर पवित्र असेल, तरच आपले मन पवित्र राहिल, कारण मनाचा आपल्या शरीराशी निकटचा संबंध असतो. जितके आपले मन पवित्र असेल तितकाच आपला आत्मा पवित्र असेल. सच्चखण्डातून आपल्या अंतर्यात येणारा 'शब्द' पवित्र आहेच. त्यामुळे आपला आत्मा जेव्हा पवित्र होतो, तेव्हा कोणतीही शक्ती आत्म्यास शब्दापासून दुरावू शकत नाही. आत्मा आपोआपच शब्दात एकरूप होऊन जातो.

लोखंडास जर गंज लागलेला असेल तर त्या लोखंडावर जरी तुम्ही लोहचुंबक ठेवलेत तरीही ते लोहचुंबक लोखंडास खेचू शकणार नाही, परंतु गंजविरहीत लोखंड असेल आणि ते जर लोहचुंबकाच्या आकर्षण कक्षेत आले तर त्यास आपोआपच ते लोहचुंबक खेचून घेईल. याचप्रमाणे आपण जरी 'शब्द'(ध्वनी) ऐकू शकत असलो, तरीही तो 'शब्द' आपणांस त्याच्याकडे खेचू शकत नाही, कारण आपला आत्मा मळाने बरबटलेला आहे.

आत्म्याच्या सफाईच्या कामामध्ये नामस्मरण झाडूचे कार्य करते. आपण झोपेत–जागृत अवस्थेत, उठता–बसता किंवा कोणाशीही बोलत असताना नामस्मरण करीत राहिले पाहिजे.

मुख की बात सगल स्यों करदा जीव संग प्रभ अपने घर दा।

प्रेमी या जगातील लोकांशी बोलत असताना त्यांचे हृदय नामस्मरणात रममाण झालेले असते. ही खूप विचार करण्याची गोष्ट आहे की नामस्मरणाची तार आपणांस सतगुरूंशी जोडून ठेवते. प्रेमीची जिव्हा सतत तल्लीन राहवयास हवी. ध्यान–अभ्यास करणे कधीही खंडीत होता कामा नये. ध्यान–अभ्यासात

केवळ एखाद्या दिवसाचा जरी खंड पडला तरी समजा की ध्यान–अभ्यासापासून तुम्ही खूपच दुरावला आहात, अनेक दिवसांचा खंड तर खूपच जास्त आहे. ज्या महात्म्यांनी परमात्म्यास त्यांच्या अंतर्यात प्रकट केले आहे, ते सांगतात:

ईक खिन्न विसरे स्वामी जानों बरस पचासा।

एका क्षणासाठी परमात्म्यास किंवा आपल्या प्रिय सतगुरूंना विसरण्याने पन्नास वर्षांचा फरक पडतो. मग विचार करा! जे लोक अनेक दिवस ध्यान–अभ्यास करीत नाहीत, तासन्तास नामस्मरण करण्याचे विसरून जातात, अशा लोकांची काय अवस्था असेल? आपणांस परमात्म्याचा एका तिळा एवढा जरी विसर पडला, तरीही भक्तीमध्ये प्रचंड दरी निर्माण होते. आपण सातत्याने परमात्म्याची आठवण ठेवायास हवी, कारण त्याची आठवणच आपला उद्धार करणार आहे.

महाराज सावन सिंहजी सांगत असत,''तुमच्याकडून जर ध्यान–अभ्यास होत नसेल, तर कमीत कमी संतांवर प्रेम तरी करा, कारण संत प्रेमाची मूर्ती असतात. अंतसमयी आपला कल जिथे असतो, मृत्यूपश्चात आपण तेथेच जाऊ. आपण संतांवर प्रेम केले तर आपण त्यांच्याशी एकरूप होऊन जाऊ व संत आपणांस परमात्म्याकडेच घेऊन जातील. परंतु जर आपण पवित्र असू, तरच संतांची आठवण काढू शकू.''

तुम्ही पाहा! आपण जगाची थोडी जरी आठवण केली, तर रात्री झोपेत पटकन स्वप्ने पडू लागतात. जगाचे विचार आपल्या अंतरात लवकर पक्के होतात, परंतु सतगुरूंचे विचार का बरे पक्के होत नाहीत? सतगुरू आपल्या स्वप्नात का बरे येत नाहीत? कारण सतगुरू पवित्र असतात. ते आपल्या मलीन हृदयात येत नाहीत कारण आपण मन–इंद्रियांच्या वशात असतो.

कधीकधी जेव्हा आपले मन शांत असते, तेव्हा आपल्या हृदयात थोडी फार पवित्रता असते. अशावेळी आपण झोपेत असताना सतगुरू कृपा करीत आपले लक्ष उच्च पातळीवर खेचून घेतात, त्यावेळी आपणांस सतगुरूंचे

स्वप्न पडते. ज्यादिवशी सतगुरू आपल्या स्वप्नात येतात दिवसभर आपले हृदय गुलाबाप्रमाणे फुललेले असते. तरीही आपण पूर्णपणे पवित्र नसल्याने आपण सतगुरूंच्या दयेचा पुरेपुर लाभ घेऊ शकत नाही. अनेकदा सतगुरू स्वप्नात तुम्हांस काही सांगू इच्छितात. ते अनेकदा सांगतात देखील! परंतु तुम्ही त्यांचे सांगणे विसरून जाता किंवा सतगुरूंचा आवाज स्पष्टपणे ऐकत नाही, कारण तुमचा कल खालच्या बाजूस असतो.

प्रेमीने नामस्मरणाच्या मदतीने स्वत:चे लक्ष नेहमी आपल्या तिसऱ्या तिळावर एकाग्र करावयास हवे. तुम्ही जेव्हा तिसऱ्या तिळावर एकाग्र होऊ लागाल, तुमचे लक्ष थोडे जरी एकाग्र होऊ लागले, तरी तुमच्या अंतरामध्ये सतगुरुं प्रती प्रचंड प्रेम जागृत होईल. मग तुम्ही ते प्रेम व तो लगाव त्यागू शकणार नाही. जसे आज प्रेम करणे आपणांस अवघड जात आहे, त्याचप्रमाणे नंतर प्रेम करण्याचे थांबविणे देखील कठीण जाते. गुरू अर्जुनदेवजी सांगतात:

तोड़ी न टूटे छोड़ी ना छूटे ऐसी माधो खिच तनी।

तुम्ही पहा! सतगुरूंच्या प्रेमींवर मोठमोठी संकटे आली. मुसलमानांचे त्याकाळी प्राबल्य अधिक होते. दिल्लीत भाई मतिदासा समोर करवत आणून ठेवली व मुगल भाई मतिदासास म्हणाले की, ''ज्याच्यासाठी (ज्या गुरूंसाठी) तू तुझे प्राण त्यागत आहेस, तो तुझ्याजवळ पिंजऱ्यामध्ये बंदी बनलेला आहे. हा स्वत:चे रक्षण करू शकत नाही तर तुझे रक्षण कसे बरे करू शकेल? आम्ही तुला चांगला हुद्दा देतो, खूप धन–संपत्ती देतो, तू याची संगत सोड आणि आमच्या धर्माचा स्वीकार कर.''

भाई मतिदास जर बहिर्मुखी असता, तर त्याचा विश्वास ठाम राहणे शक्य होते काय? परंतु तो अंतर्यात जाऊन पाहत असे की माझे सतगुरू विश्वाचे मालक आहेत. तो म्हणू लागला,''तुम्ही असे बोलू नका. तुम्हाला माझी जर कीव येत असेल व तुम्ही जर माझ्यावर काही दया करू इच्छित असाल, तर माझे तोंड माझ्या प्रिय गुरूंच्या दिशेने करून मला करवतीने

लवकर कापून टाका.'' जल्लाददेखील भाई मतिदासचे सतगुरूप्रती असलेले प्रांजल प्रेम पाहून थरारला.

प्रेमीच्या अंतरात एकदा का प्रेम प्रकट झाले की मग त्यामध्ये पुढे-पुढे आणखीन वाढ होऊ लागते. ज्याप्रमाणे दिव्याची वात जळत असताना तिचे वरचे टोक कापल्यावर ती आणखीन प्रज्वलीत होते, त्याचप्रमाणे प्रेमी अंतर्यात जाऊ लागल्यानंतर पुढे काहाही झाले, तरी त्याचे सतगुरूंप्रती असलेले प्रेम कधी खंडीत होत नाही. जर काही अघटीत घडले, तर त्यास तो आपल्या कर्मांचे फळ समजतो. आपण ध्यान-अभ्यास करणे सोडू नये, तो अंत:करणापासून करावा. ध्यान-अभ्यासास प्राधान्य देऊन जगाच्या कामास दुय्यम स्थान द्यावे. महाराज सावन सिंहजी सांगत असत:

हत्थ कार वन्नी दिल यार कन्नी।

आपली अवस्था अशी व्हावयास हवी की हात-पाय कामामध्ये व्यस्त असताना अंतरामध्ये नामरूपी तारेचे स्वर गुंजत राहिले पाहिजे. आपल्या अंतरामधील तार सतत नामाशी जोडलेली असावयास हवी. आपल्यासाठी नामस्मरण आणि ध्यान-अभ्यास अतिशय गरजेचे आहे. सुरवातीलाच मी तुम्हांस सांगितले होते की, आपले शरीर आणि मन, दोन्हीही पवित्र असावयास हवे. आपले मन जर पवित्र असेल तरच आपण ध्यान-अभ्यास करू शकतो. परंतु जर का आपले मन विषय-विकारांनी लडबडलेले असेल तर आपण ध्यान-अभ्यास करू शकत नाही. सतगुरू जी काही आपणांवर कृपा करतात, ती आपल्या आंतरिक स्वच्छता करण्यातच कामी येते. पुन्हा सतगुरू कृपा करतात, परंतु आपण पुन्हा विषयांच्या मळाने मलीन होतो.

आपण जेव्हा विषय-विकारांमध्ये फसतो, तेव्हा काळ सतगुरूस म्हणतो की, तू याला नाम दिले आहेस? याचे कर्तुत्व तर पहा! श्वासा-श्वासाला आपण करीत असलेली कर्मं, आपल्या अंतरामध्ये वसत असलेली शक्ती पाहत असते. सतगुरू आपल्या अंतरामध्ये वसत असून ते अंतर्यामी आहेत.

हे जग काळाचे असल्याने आपण करीत असलेली कर्मं तो देखील पाहत असतो. तो जर पाहत नसता तर पाप–पुण्याचा हिशोब कोणी दिला असता? तुम्ही जी काही कर्मं करीत आहात, ती काळ पाहत असतो, त्यांची नोंद देखील करीत असतो.

सतगुरू अत्यंत सहनशील असतात. ते आपणांवर विश्वास ठेवतात व काळास सांगतात, हा नक्कीच सुधारेल. आपण जर नामस्मरण करीत राहिलो, तर सतगुरू आपल्यावर उदंड कृपा करतात व एके दिवशी आपण परमार्थात यशस्वी होतो. आजचे काम आपण उद्यावर ढकलू नये. आपण आज–उद्या अशी टाळंटाळ करीत आपला वेळ वाया घालवू नये की ध्यान–अभ्यास आज करू, उद्या करू, परवा करू. जे मन आज तुम्हांस सल्ला देत आहे की, आज–रात्र मोठी आहे. उद्या ध्यान–अभ्यास करू, ते मन उद्यादेखील हाच सल्ला देईल, ते आपल्या अंतरामध्येच आहे. कबीर साहेब सांगतात:

कल करन्ता अब कर अब करता सोई ताल।
पाछे कछू न होवई जो सिर पर आयो काल।।

आपण सर्वांनी अंत:करणापासून ध्यान–अभ्यास–नामस्मरण करणे अत्यावश्यक आहे. मरणोत्तर आपल्या सोबत जाणारी शिदोरी आपण का जमा करू नये! ध्यान–अभ्यास आणि नामस्मरणाची शिदोरी आपल्या सोबत जाणार आहे. संसारातील कामे देखील करावी, ती सोडून देऊ नयेत. जो मनुष्य शब्द–नामाची कमाई करण्यास स्वत:ची जबाबदारी मानतो, तो मनुष्य संसारातील कामे देखील चांगल्या रितीने पार पाडू शकतो.

येथे जो एक दिवसाचा कार्यक्रम होता, त्याची आता समाप्ती झालेली आहे. मी तुम्हां सर्वांचा आभारी आहे, कारण तुम्ही वेळात वेळ काढलात व तो ध्यान–अभ्यास आणि नामस्मरणात व्यतीत केलात. येथून गेल्यानंतरही तुम्ही तुमचा ध्यान–अभ्यास व नामस्मरण करीत राहावे.

***



खरी मशीद

सत्संग: परमसंत अजायब सिंहजी महाराज, कबीर साहेबांची वाणी,
मुंबई, महाराष्ट्र – १२ जानेवारी १९९४

बंधुंनो, आपल्यासमोर कबीर साहेबांची छोटीशी वाणी सादर केली जात आहे, ती लक्षपूर्वक ऐकून समजून घेण्यासारखी आहे. खडीसाखर कोणत्याही बाजूने चाखली तरी ती मधुरच लागते. त्याचप्रमाणे संत–महात्मा कोणत्याही युगात, तसेच कोणत्याही समाजात होऊन गेले असोत, त्या सर्व महात्म्यांचा एकच उपदेश होता की, सर्वांचा परमात्मा एकच असून त्यास प्राप्त करण्याचा मार्ग व साधनदेखील एकच आहे.

मी काल रात्रीदेखील सत्संगात सांगितले होते की, संत–महात्मा स्वत:च्या इच्छेने या संसारात येत नाहीत. परमात्म्याच्या आज्ञेवरून ते या जगात येतात. ते स्वत:च्या इच्छेने परमार्थाचा प्रचारही करीत नाहीत व नामदानही देत नाहीत. परमेश्वरद्वारी ज्या आत्म्यांच्या नशिबात संत समागम लिहीला जातो, अशा आत्म्यांना परमात्मा संतांकडे पाठवितो. या आत्म्यांना नाम मार्गावर आणण्याची जबाबदारी महात्म्यांवर येते. ही सर्व परमेश्वराचीच योजना असते.

निसर्गाने नियम बनविलेले आहेत. हे सर्व अगोदरपासूनच सुनिश्चित असते की कोणत्या आत्म्यास कधी व कोणत्या जन्मात नाम प्राप्त होईल वा त्यास पुन्हा या संसारचक्रात फिरावे लागेल. जीवात्मा दूर रहातो का जवळ याचा महात्म्यांना काही फरक पडत नाही. महात्माच निर्णय घेतात की एखाद्या आत्म्याकडे आपण स्वत: जावे कि एखाद्या सत्संगीस माध्यम बनवून त्यास जवळ आणावे किंवा एखाद्या सत्संगीस पडद्याआडून प्रेरणा देऊन आत्म्यास नामदानासाठी प्रेरित करावे. आपण सत्संगी स्वत:च्या डोळ्यांनी सर्व पाहतो, अशा घटना आपल्या बाबतीतही घडतात. गुरू अर्जुन देवजी महाराज सांगतात:

आपण लिए जे मिले विछुड़ को रोवन ।

हे परमात्मा! तुझी भेट घेणे जर आमच्या हाती असते, तर आम्ही तुझ्या पासून दुरावून चारही बाजूंना, दहा दिशांनी तसेच उच्च-नीच योनींमध्ये जन्म घेत का फिरत राहिलो असतो? ही कृपा तर तूच केलेली आहेस. आत्मा दृष्टीहीन आहे व परमात्मा दृष्टीवान आहे. तो कोणासही हाक मारून त्याच्या हातामध्ये आपले बोट देऊ शकतो आणि तो तसे करतो देखील!

महात्मा कधीही अगोदर अस्तित्वात असलेला समाज समाप्त करण्यासाठी किंवा एखादा नवीन समाज बनविण्यासाठी येत नाहीत. ते आपसांत प्रेमभाव राखणे शिकविण्यासाठी व आपल्याद्वारे परमात्म्याची भक्ती करवून घेण्यासाठी येतात. महात्मांकडे निरनिराळ्या समाजातील लोक जातात. तेथे आपोआपच एक समूह बनतो. जोपर्यंत तेथे नाम-अभ्यासाची कमाई करणारे महात्मा येतात, तोपर्यंत तेथे तृष्णार्त आत्म्यांची तहान भागते, तेथे येणाऱ्यांना नामरूपी अमृत प्राप्त होत राहते. परंतु नामाची कमाई केलेले महात्मा तेथून निघून गेल्यानंतर, त्या महात्म्यांचे अनुयायीच समुहातील लोकांना नाम-दान देऊ लागतात. मग तेथे समाज निर्माण होतो. त्या समुहाचे मूळ आपण पाहू शकतो.

आजपासून सुमारे सव्वा पाचशे वर्षांपूर्वी शिख समाजाचे नामोनिशाणदेखील नव्हते. गुरू नानकदेवजी व त्यानंतर नऊ गुरू आले. जोपर्यंत दहा गुरू या संसारात राहिले, तोपर्यंत या समाजाचे कोणतेही नाव पडले नव्हते. त्यांच्याकडून हिंदु, मुसलमान, ख्रिश्चन अशा विविध धर्मिय लोकांनी जाऊन लाभ घेतला, जो कोणी आला, त्यास त्यांनी शब्द-नामाशी जोडले. ते जसे मंदिरांमध्ये गेले तसेच मशीदींमध्येदेखील गेले. गुरू गोविंद सिंहजी त्यांच्या वाणीत लिहितात:

दयोरा और मसीत वही ।

देऊळ आणि मशीद, दोन्ही परमात्म्याच्या भक्तीसाठीच बनविलेले असतात. परंतु आपण जेव्हा यांना धर्माचे स्वरूप देतो तेव्हा कोणी स्वत: हिंदु, मुसलमान, शिख वा ख्रिश्चन समजू लागतो. आपण स्वत:चे रितीरीवाज श्रेष्ठ मानतो व इतरांची घृणा करू लागतो.

लोदी सुल्तानपुर येथे गुरू नानकदेवजी महाराज भुसारमाल विक्रेत्याचे काम करीत होते. एके दिवशी त्यांना जगामध्ये परमात्म्याचा संदेश देण्याचा आदेश झाला असता, ते आपले काम सोडून स्मशानभूमीतील थडग्यांमध्ये जाऊन बसले. त्यांना कोणी भूत तर कोणी वेताळ म्हणू लागले. त्यांनी त्यांच्या वाणीमध्ये म्हटले आहे:

कोई आखे भूतना कोई कहे बेताला। कोई आखे आदमी नानक बेचारा ।।

त्यावेळी लोकांनी त्यांना विचारले की, आपण हिंदु आहात की मुसलमान? गुरू नानकदेवजी म्हणाले:

हिन्दु कहे ता मारिए मुसलमान भी नाहे।
पांच तत्त्व का पुतला गैबी खेले माहे ।।

तुम्हा मुसलमानांचे येथे वर्चस्व असल्याने मी जर स्वत:स हिंदु म्हटले तर तुम्ही मला माराल, परंतु तुम्ही मला जसा मुसलमान समजता तसा मुसलमान देखील मी नाही.

दौलतखान पठाण सुल्तानपुर लोदी प्रांताचा राजा होता. तो गुरू नानकदेवजी महाराजांना म्हणाला की, तुम्ही जर मुसलमान आहात, तर आमच्या बरोबर येऊन नमाज पढावा. गुरू नानकदेवजी म्हणाले,''की नमाज पढल्याने तुम्हांस जर आनंद होत असेल, चला आपण सोबत जाऊ.'' सर्वजणांनी मशीदीमध्ये जाऊन नमाज पढण्यास सुरुवात केली असता गुरू नानकदेवजी महाराज स्तब्ध उभे राहिले. त्यावर मौलवी आक्षेप घेऊ लागले. दौलतखान पठाणदेखील म्हणाला,''मशीदीमध्ये येऊनही तू आमच्या सोबत नमाज पढला नाहीस.'' त्यावर गुरू नानकदेवजी महाराज म्हणाले,''मी कोणासोबत नमाज पढावा? मौलवी साहेब नमाज पढणार होते परंतु त्यांच्या घरची घोडी बाळंत होण्याच्या तयारीत होती, त्यामुळे त्यांचे लक्ष त्या पिल्लावर होते, की घराच्या दाराजवळील विहीरीत ते पिल्लु पडू नये आणि तू त्यावेळी काबुलमध्ये घोडे खरेदी करण्याच्या विचारात मग्न होतास.'' त्यावर त्या राजाने मान्य केले की माझे वारंवार लक्ष

घोडे खरेदीकडे जात होते. मौलवीदेखील म्हणाला की, खरोखरच माझी घोडी बाळंत होणार असल्याने माझे लक्ष वारंवार तेथे जात होते. गुरू नानकदेवजींचा त्यांना समजावण्याचा हाच हेतु होता की तुम्ही जमिनीवर तुमचे माथे तर रगडता, परंतु तुमचे लक्ष मात्र इतरत्र असते. तुम्ही नित्यनेमाने नमाज पढणारे खरे मुसलमान आहात असे दर्शवून तुम्ही जगाची फसवणूक तर करीतच आहात, परंतु तुमच्या अंतरात वसत असलेल्या परमात्म्याची फसवणूक आजपर्यंत ना कोणी करू शकला आहे, ना कधी करू शकेल.

नि:संशयपणे कबीरसाहेब मुसलमान घराण्यामध्ये जन्मास आले. परंतु हिंदु तसेच मुसलमान दोन्हीही धर्मांचे लोक त्यांचे विरोधक होते, कारण खरे संत कोणत्याही धर्मात असलेल्या रितीरीवाजांचा अंगिकार करीत नाहीत. जो प्रश्न गुरू नानकदेवजींना विचारला गेला तोच प्रश्न कबीरसाहेबांनादेखील विचारला गेला की, तुम्ही हिंदु आहात की मुसलमान? कबीर साहेब म्हणाले :

न मैं हिन्दु न मुसलमान अल्लाह राम के पिंड प्राण ।

मी हिंदु ही नाही आणि मी मुसलमानदेखील नाही. तुम्ही मला भले अल्लाचे मुल समजा वा रामाचे मुल समजा! कारण राम आणि अल्लाह एकच आहेत. पूर्वी होऊन गेलेले सर्व गुरू वा पीर वाईट कर्मं करून गेले नाहीत, त्यांनी त्यांच्या काळच्या लोकांना नामाशी जोडून सच्चखंडामध्ये पोहचविण्याचे कार्य केले. माझ्या हृदयात त्यांचा खूप आदर आहे. गुरू नानकदेवजी महाराजांनी देखील सांगितले आहे की, माझ्या हृदयात सर्व गुरू–पीरांचा आदर आहे. स्वामीजी महाराजदेखील सांगतात:

सबको करूं प्रणाम हाथ जोड़कर।

कबीर साहेबांच्या कालावधीमध्ये, मोठा शक्तिशाली राजा, लोदी सिकंदर राज्य करीत होता. कबीर साहेबांना ठार करण्यासाठी त्याने शक्य तेवढ्या सगळ्या मार्गांचा वापर केला. त्याने कबीर साहेबांचे हात–पाय साखळदंडांनी बांधून त्यांना गंगा नदीच्या पाण्यामध्ये टाकून दिले, परंतु परमात्म्याने तेथेदेखील

कबीर साहेबांचे रक्षण केले, ते साखळदंड तुटून गेले. कबीर साहेब गंगा नदीच्या पाण्यावर अशा तऱ्हेने तरंगू लागले, जसे एखादा साधु शांतपणे मृगजिनावर बसून ध्यान करीत असतो. कबीर साहेब स्वत: या घटनेचे वर्णन करतात:

गंग गुसाईंन गहन गंभीर जंजीर बांधकर खड़े कबीर ।
मन न डोले तन काहे डराए चित्त चरन कमल रहया समाए ।।

आपण सांगत आहात,''मला साखळदंडांनी जखडून अतिशय खोल नदीच्या पाण्यात ढकलून दिले. माझे मन प्रभुचरणी लीन असल्याने शरीराचे कसले भय? ते नष्ट झाले तरीही काय फरक पडणार होता? आपण जेव्हा स्वत:स परमात्म्याच्या स्वाधीन करतो, तेव्हा परमात्मादेखील आपले रक्षण करतो. नंतर एकदा मद्यधुंद हत्तीसमोर, माझे हात-पाय बांधून, मला टाकून दिले.'' या घटनेचे वर्णन कबीर साहेब करीत आहेत:

क्या अपराध सन्त है कीन्हा, बांध पोट कुंचर को दीन्हा ।
कुंचर पोट ले ले नमस्कारा, बूझे न काजी अंधियारा ।
तीन बार पतिया भर लीन्हा, मन कठोर अजहू न पतीन्हा ।।

आपण हे सर्व का करतो? कारण आपल्या अंतरामध्ये इतरांप्रती ईर्षा असते, धर्मांधतेचे विष चढलेले असते. आपण विचार करतो की, ज्या पद्धतीने आपण परमात्म्याची भक्ती, रितीरीवाज करतो, इतरजण त्यापद्धतीने का करीत नाहीत? प्रियजनहो! ज्यास सत्याचे आकलन होते ते सांगतात:

साच कहूँ तो कोई न माने, झूठ कहा न जाई हो।

सत्य तर हे आहे की परमात्मा आपल्या अंतरामध्ये वसत आहे. हिंदु, मुसलमान, शिख, ईसाई सर्वांचा परमात्मा एकच आहे आणि तो सर्वांच्या अंतरामध्ये असून, तेथेच तो सर्वांना भेटू शकतो. बुल्लेशाह सांगतात :

सच कहां तां भाबंड़ मचदा है, झूठ आखां तां कुछ न बचदा है ।

देखो जग बौराना साधो गुरु का मर्म न जाना।।

कबीर साहेब सांगत आहेत,''पाहा! हे जग कशा प्रकारे मनाच्या नशेमध्ये, जात-धर्माच्या प्रेमामध्ये निद्रावस्थेत आहे? या जगामध्ये उच्च-उच्चकोटींचे

महात्मे आले. ते खरे तर आपली या जगामधून सुटका करण्यासाठी येतात. परंतु आपण त्यांचा छळ करतो, त्यांना यातना देतो.

गुरू नानकदेवजींना चुकीच्या मार्गावर नेणारे असे दुषण दिले गेले. लोकांची मती भ्रष्ट करतात असा आरोप करीत कसुर विभागामधील एका गांवामधील लोकांनी त्यांना गावात येऊदेखील दिले नाही. गुरू नानकदेवजींनी ती रात्र गावाबाहेरील कुष्ठरोग्याच्या झोपडीत व्यतीत केली. परिणामस्वरूप त्या कुष्ठरोग्याचा आजार नाहीसा झाला. येशू क्रिस्त याजगात केवळ आत्म्यांना परमात्म्याशी जोडण्यासाठी आले होते, तरीदेखील लोकांनी त्यांना सुळावर चढविले व त्यांच्या डोक्यावर काट्यांचा मुकुट चढविला.

मोहम्मदसाहेबांना मक्केमधून लोकांनी हाकलून दिले. ते तेथून मदिना येथे गेले. तेथे ते तीन दिवस एका गुहेत तहानलेल्या-भुकेलेल्या अवस्थेत राहिले. त्यांना शहरामधून बाहेर हाकलताना लोकं घरांच्या छतावर हातामध्ये घाण घेऊन उभे राहिले. त्या घाणीचा त्यांनी मोहम्मदसाहेबांच्या डोक्यावर वर्षाव केला. आता तुम्हीच पहा! त्या परमात्म्याच्या प्रिय महात्म्यांचा काय दोष होता? ते केवळ हेच सांगत होते,''आपणांस परमात्म्याने दिलेले शरीर हेच **खरी मशीद** आहे. परमात्मा विटा-दगडांमध्ये राहत नसून, या **खऱ्या मशीदीत** राहतो. खुदा बाहेर नसून तो आपल्या अंतरामध्ये आहे.'' परंतु अंतरामध्ये जाण्याऐवजी लोकांनी त्यांनाच यातना दिल्या. ते हेदेखील म्हणाले की, बाहेर दिवे लावण्याची गरज नाही, तो आपल्या अंतरामध्ये प्रज्वलीत अवस्थेत आहे. बाहेर मोठ-मोठ्याने कलमा बोलण्याने तुम्ही परमात्म्यास भेटू शकत नाही. परमात्मा आपल्या अंतरात आहे, न बोलता देखील त्याचे अंतर्यात उच्चारण केले जाऊ शकते. खरा नमाजी तोच आहे, ज्याचे ओठ हालत नाहीत, नेत्र स्थिर आहेत, टाळूदेखील हालत नाही. कारण कलमा हृदयाचा असून, तो हृदयातूनच म्हटला जातो.'' परंतु दुर्दैव आहे की, महात्मा या जगातून गेल्यानंतर त्यांचे अनुयायी, ज्या जागेवर त्या महात्म्यांनी

आठ–दहा दिवस व्यतीत केलेले असतात, त्या जागेचे पुजन करण्यास सुरुवात करतात. तेथेही लोकांचे निरनिराळ्या समुहांमध्ये विभाजन होते. त्या समुहांमधूनच सन्यासी, जोगी, जंगम, बौद्ध निर्माण झाले.

बायबल एक आहे, येशू क्रिस्त एक आहे, सर्व ईसाई त्यांना मानतात. परंतु त्या ईसाई लोकांमध्ये देखील एवढे निरनिराळे पंथ आहेत की त्यांचा काही हिशोबच नाही. प्रत्येक पंथाचा इतर पंथांशी पूर्णपणे मतभेद आहे. दुसऱ्या विश्वयुद्धामध्ये मी स्वत: पाहिले की, ईसाई लोकं, ईसाई लोकांनाच ठार मारीत होते. याचप्रमाणे शिख धर्मियांचा गुरू ग्रंथसाहेब एकच आहे. सर्व गुरू एकाच ज्योतीतून निर्माण झाले तरीही त्यांचे देखील पंन्नासाहून अधिक पंथ तयार झालेले आहेत. याचप्रमाणे हिंदुंचे रामायण, गीता एकच आहे. सर्व हिंदु समाज रामास मानतात, परंतु त्यांचे पंथ मोजलेच जाऊ शकत नाहीत, सध्या किती पंथ अस्तित्वात आहेत आणि भविष्यात किती निर्माण होतील याबद्दल काही सांगता येणार नाही.

कबीर साहेब प्रेमाने समजावत आहेत, ''आपण सर्व वेड लागल्याप्रमाणे एकमेकांशी लढत आहोत. सत्याचा आपणांस समज नाही. कारण आपणांस गुरू भेटले नाहीत, नाम प्राप्त झाले नाही. आपणांस जर गुरू व नाम लाभले असते तर आपल्या हे लक्षातही आले नसते की, हा मनुष्य कोणत्या देशाचा वा जातीचा आहे, तो गरीब आहे की श्रीमंत आहे.''

संत–सतगुरू अतिशय प्रेमाने आपणांस समजावतात की, आत्मा या नात्याने आपण सर्वजण एकच आहोत. अगोदरही आपण एकाच परमात्म्याची संतती होतो आणि पुढेही आपण सर्वजण परमात्म्याकडेच जाणार आहोत. परमात्मा प्रेमस्वरूप आहे.

मी आपणांस तेच प्रेम शिकविण्यासाठी आलो आहे. जोपर्यंत प्रेमाचा धडा शिकविणे चालू असते, तोपर्यंत आपण एकमेकांवर प्रेम करतो. आपणांस जेव्हा प्रेमाचा विसर पडतो, तेव्हा आपण एकमेकांचा द्वेष करू लागतो.

हिन्दु कहत है राम हमारा मुसलमान रहमाना ।।
आपस में दोऊ लड़े मरत है दुविधा में लिपटाना ।।

कबीर साहेब ज्यावेळी या जगात अस्थित्वात होते, त्याकाळी तसे बरेच जाती व समाज हिंदुस्थानात होते, परंतु हिंदु व मुसलमान या दोन समाजांचा सर्वाधिक प्रभाव होता. हे दोन्ही समाज एकमेकांचा अत्यंत तिरस्कार करीत असत, ते एकमेकांच्या रक्ताचे तहानेलेले होते.

कबीर साहेब सांगतात,''तुम्ही आपापसांमध्ये का लढत आहात? हिंदु म्हणतात, की राम आमचा आहे तर मुसलमान म्हणतात अल्लाह आमचा आहे. परंतु यांना या सत्याची कल्पना नाही की या सर्व शक्ती एकच आहेत, मग तुम्ही त्या शक्तीस राम, अल्लाह, वाहे गुरू, गॉड, काहीही म्हणा!''

महाराज सावन सिंहजी एक लहानशी गोष्ट सांगत असत. एक मनुष्य पूर्वेकडे राहणारा होता, तर दुसरा मनुष्य सीमाप्रांतात राहाणारा होता. त्या दोघांनी भागिदारीमध्ये शेतात पेरणी करण्याचे ठरविले. पेरणीच्या वेळी पूर्वभागातील मनुष्य म्हणाला की, मी गहू पेरीन, सीमा प्रांतांमधील मनुष्य म्हणाला मी गंदम पेरीन. त्यांचे आपापसामध्ये खूप भांडण झाले.

तेथून एक मनुष्य जात होता. त्या दोघांना भांडताना पाहून तो मनुष्य थांबला. तो म्हणाला,''तुम्ही दोघेजण आपापले बियाणे घेऊन या, मी तुमचा निर्णय करतो.'' त्या दोघांनी बियाणे आणले असता असे लक्षात आले की, दोन्ही बियाणे एकाच प्रकारचे आहेत. तो मनुष्य म्हणाला,''तुम्ही दोघेही एकच बियाणे पेरू इच्छित आहात, परंतु फरक आहे तो शब्दांचा.''

याचप्रमाणे राम-अल्लाह या शब्दांमध्ये फरक आहे, परंतु ती शक्ती एकच आहे. संत या जगामध्ये येऊन हेच समजावतात की, तुम्ही अंतर्यात जाऊन पहा. महात्म्यांनी त्या एकाच शक्तीला, प्रेमाने निरनिराळी नांवे दिलेली आहेत.

या जगामध्ये अनेक देश आहेत. प्रत्येक देशांमध्ये अनेक राज्ये आहेत. त्यामध्ये अनेक बोलीभाषा आहेत. त्या हजारो भाषांमध्ये आपण आपापल्या प्रेमामध्ये परमात्म्यास नावे दिलेली आहेत. ही सर्व आपली सामाजिक वर्णात्मक नावे आहेत. परंतु धुनात्मक नाम आपणांस मुक्ती देते.

गुरू अंगददेवजी महाराज सांगतात, ''धुनात्मक नामाचे उच्चारण आपण आपल्या जिव्हेद्वारे करू शकत नाही, ते आपण आपल्या चमड्यांच्या नेत्रांनी पाहूही शकत नाही. ती तर अंतर्यातील चढाई आहे, जी आपण आपल्या या हाता-पायांच्या मदतीने करू शकत नाही. ही आपण पाहू न शकणारी, उच्चारण न करू शकणारी कायदेप्रणाली आहे.'' कबीर साहेब सांगतात:

अल्लाह लख न जाई लखया, गुरु गुरु दीन्हा मीठा ।
कहे कबीर मेरी शंका नाठी ते सर्व निरंजन डीठा ।।

अल्लाह अलख असून त्यास या डोळ्यांनी पाहिले जाऊ शकत नाही. मला सत्गुरूंनी मधुर आणि प्रेममय नाम दिल्यानंतर माझे शंकानिरसन झाले कारण मी अंतर्यात गेल्यानंतर सर्वांमध्ये त्यास पाहिले.'' आपल्या अंतर्यामध्ये पाहिल्यानंतरच त्यास बाहेर पाहिले. गुरू नानकदेवजी महाराज सांगतात:

राम राम सबको कहे कहयां राम न होय ।
गुरू प्रसादी राम मन बसे तां फल पावे कोय ।।

पोपटाप्रमाणे राम-राम म्हटल्यावर राम प्राप्त होत नाही. एखाद्या महात्म्याने आपल्यावर कृपा केली तरच आपण त्या रामास पाहू शकतो, त्याच्यापासून फायदा करून घेऊ शकतो.

बहुत मिले मोहे नेमी धर्मी प्रात करें इसनाना ।।
आतम छोड़ पछाने पूजे तिनका थोथा ज्ञाना ।।

कबीर साहेब सांगतात, मला नित्य-नेमाने धार्मिक कार्य करणारे अनेकजण भेटले. त्यांचा असा नेम असतो की, दररोज सकाळी उठून स्नान करून मूर्तीपूजा करणे व ध्यान-धारणा करणे आणि लोकांना कथा-किर्तन ऐकविणे.

खरे तर त्यांनी आपल्या आत्म्याचा परिचय करून घ्यावयास हवा होता की, आत्मा परमात्म्याचा अंश असून त्याची परमात्म्याशी गाठ घालून द्यावी. आत्मा चेतन असून दगड जड आहे. मनुष्य या जड़ वस्तूसमोर माथा टेकवितो, परंतु दगडास पाण्यात टाकल्यावरही तो काही बोलत नाही. जर तो स्वत:चे रक्षण करू शकत नाही. तर तो आपले रक्षण कसे बरे करेल?''

ठाकुर पुजे मुल्ल ले मन हठ तीर्थ जाए ।
देखा देखी स्वांग घर भूले भटका खाए ।
पाहन परमेश्वर किए पूजे सब संसार ।
इस भरवासे जे रहे सो डूबे काली धार ।।

ईक जो कहिए पीर औलिया पढ़े किताब कुराना ।।
करे मुरीद कब्र बतलावें उन्हूं खुदा न जाना ।।

ज्याप्रमाणे हिंदुंमध्ये ऋषि–मुनी होऊन गेले, परंतु त्यांना पूर्णगुरू न लाभल्यामुळे पुराणांमध्ये त्यांची खिल्ली उडवली गेली की कामाच्या आहारी जाऊन ते अपमानित झाले. याचप्रमाणे मुसलमानांमध्ये त्यांना पीर, औलिया वा पैगंबर म्हटले जाते. ते लोकांना स्वत:चे शिष्य बनवितात, परंतु त्यांना कबरीची पुजा करण्यासाठी पाठवितात. मोहम्मद साहेबांचा जेथे जन्म झाला होता, त्या ठिकाणी त्यांचे थडगे आहे, ज्यास मक्का म्हटले जाते. जो एकदा जरी मक्का येथे जाऊन येतो, त्यास म्हटले जाते की, तू हज करून आला असल्याने तुझ्या आयुष्याचा विमा झालेला आहे. गुरू नानकदेवजी सांगतात:

अंधे का राह दसया अंधा होय सुजाय ।
होय सुजाखा नानका सो क्यों औजड़ पाय ।।

एखादा अंध मनुष्य जर नावेचा नाविक बनला आणि त्या नावेमध्ये सर्व अंधच लोक बसले तर तो अंध नाविक त्या नावेस कोठेतरी नेऊन पाण्यात नक्कीच बुडवून टाकेल. कबीर साहेब सांगतात:

बामन की कथा सौ चोरन की नाव ।
सब अंधे मिल बैठयां ते भावे तह ले जात ।।

एखाद्या मुनष्याने स्वत:च गोड पदार्थ खाऊन त्याचा स्वाद घेतलेला नसेल, तरीही इतरांना त्या गोडाव्याचा अनुभव सांगू लागला, तर त्याच्यावर विश्वास ठेवणारे इतर गोड पदार्थाच्या स्वादाचा अनुभव घेऊ शकतील का?

आपले सतगुरू महाराज कृपाल नेहमीच सांगत असत,''सुशिक्षित मनुष्यच इतरांना शिकवू शकतो, तसेच पैलवानच इतरांना पैलवानकी शिकवू शकतो. ज्याने स्वत: आपल्या जीवनात ध्यान-अभ्यास केलेला आहे व परमात्म्यास स्वत: भेटलेला आहे, तोच मनुष्य आपणांस अंतर्यात जाण्याचा मार्ग दाखवू शकतो आणि आपणांद्वारे ध्यान-अभ्यास करवू शकतो.''

हिन्दु की दया मेहर तुर्कन की दोनो घर से भागी ।।
वह करें जिह्वा वह झटका मारे आग दोऊ घर लागी ।।

कबीर साहेब अतिशय प्रेमाने सांगत आहेत,''हिंदुच्या अंतरामधील दया आणि मुसलमानांमधील करुणता संपून गेली आहे. या पृथ्वीवर राहण्याचा जितका अधिकार मनुष्यास आहे तितकाच अधिकार पशु-पक्ष्यांनादेखील आहे. हिंदु लोक एका घावात पशुंची हत्या करून त्यास झटका संबोधतात तर मुस्लिम पशुंची हत्या हळू-हळू करीत त्यास हलाल म्हणतात. शरीरामधून आत्मारूपी ज्योत जेव्हा निघून जाते, तेव्हा मागे फक्त मृत शरीर उरते. मग त्यास आपण झटका वा हलाल, कसे बरे म्हणू शकतो?''

भाई गुरूदासजींनी त्यांच्या वाणीत एका बकरीचे उदाहरण दिले आहे. बकरीस जेव्हा वाघ खाऊ लागला, तेव्हा ती हसू लागली. बकरीस हसताना पाहून वाघ आश्चर्यचकित झाला. त्याने बकरीस विचारले,''मी तुला ठार मारून खात असतानाही तू हसत आहेस?''बकरी म्हणाली,''परमात्मा जर माझी विनंती ऐकत असेल, तर त्याने आमच्या पिल्लांचे खच्चीकरण करावे, जेणेकरून त्यांना पिल्ले होऊ नयेत, त्यांना दु:ख सहन कराव लागू नये. आम्ही तर केवळ गवत-पाने खात असूनही आम्हास उलटे टांगून आमची चामडी उतरवली जाते, मग आमचे मांस खाणाऱ्यांचे काय बरे हाल होतील?''

तुलसी साहेबजींनी घट रामायणाच्या दुसऱ्या भागात गुरू नानकदेवजींची खूप स्तुती केली की त्यांनी खूप मोठा ग्रंथ लिहिला, ज्यामध्ये मद्य–मांसास स्थान दिले नाही, किंबहुना मांस भक्षण करणाऱ्यास हीन म्हटले आहे:

हक पराया नानका उस सूर उस गाय ।
गुरू पीर हामां तां भरे जे मुरदार न खाय ।।

या विध हँसत चलत हैं हमको आप कहावें स्याना ।।
कहे कबीर सुनो भई साधो इनमें कौन दिवाना ।।

कबीर साहेब सांगत आहेत, ''आमच्याकडे पाहून लोकं हसतात, आमची मस्करी करतात की यांना पुजा–अर्चनेचे ज्ञानच नाही व स्वत:स मात्र ते ज्ञानी समजतात. तुम्ही विचार करा! या समाजांमध्ये कोणी दिवाने बनून फिरत आहे? कोणी परमात्म्याची भक्ती करीत आहे? मांस भक्षण केल्याने आपली राक्षस बुद्धी होते, आपल्यावर प्रचंड वाईट कर्मांचे ओझे चढते. त्यामुळे सच्चखंडामधून जे कोणी संत येतात, ते आपणांस मद्य–मांस भक्षण वर्ज्य करण्यास सांगतात.''

जी जो मारे जोरकर ले जवाब खुदाय। दफ्तर लेखा मंगिए तब मार मुए मुए खाय।
दिन को रोजा रखत है रात हनत है गाय। वे खून वो बंदगी क्यों खुश होय खुदाय।।

कबीर साहेबांचा हे सर्व समजावण्याचा हाच हेतू आहे की, आपण रिती–रिवाज कितीही प्रेमभावाने केले, तरीही ते आपणांस मुक्ती मिळवून देऊ शकत नाही. खरी मुक्ती नामामध्ये आहे. रिती–रिवाज फळाच्या सालाप्रमाणे असून नाम फळाचा गाभा आहे. संत आपले लक्ष बाहेरून हरवून नामाशी संलग्न करवू इच्छितात. आपलेदेखील कर्तव्य आहे की, आपण सर्व समाजांचा आदर करीत सर्वांवर प्रेम करावे. कारण आत्मा पशु–पक्षी, सर्वांच्याच अंतरामध्ये आहे. गुरू गोविंद सिंहजी प्रेमाने सांगतात, ''परमात्मा हत्तीचा चित्कार नंतर ऐकतो, परंतु मुंगीची हांक तो अगोदर ऐकतो.'' दहा गुरूंपासून त्यांचे सेवक बंदा बहादुरपर्यंत कोणत्याही सेवकाने लंगरमध्ये



तामसिक अन्न, लाल मिरची, कांदा आणि मांस यांना स्थान दिले नाही. आजदेखील त्यांच्या हुकुमनाम्या नुसार आपणांस कल्पना येते की, शिख समाजात लंगरची जी परंपरा आहे, त्या परंपरेला अनुसरून लंगरमध्ये मांस शिजवले जात नाही. परंतु स्वादु लोक गुरूसाहेबांच्या वाणींमधील काही ओळींचा संदर्भ देतात. खरेतर त्या देखील मद्य–मांस यांचे सेवन करण्यास प्रेरीत नाहीत, तरीही काही वाममार्गी पुरुष आपला स्वार्थ साधण्याच्या हेतुने त्या ओळींपासून तसा अर्थ काढतात. गुरू नानक देवजी महाराज सांगतात:

लिए दिए बिन रहे न कोए ।

जेवढे आपले कर्मांचे ओझे कमी असेल तेवढे चांगले आहे. ज्याची आपण मान कापू, त्याची परतफेड आपणांस नक्कीच पुढच्या जन्मी करावी लागेल. महाराज कृपाल सिंहजी सांगत असत,''हे राज्य न्यायाचे आहे. काळदेखील त्याप्रमाणे न्याय करतो. जो जे काही कर्म करतो, त्यास ते भोगावेच लागते.''

कबीरसाहेबांनी या लहानशा वाणीमध्ये आपणांस अतिशय सविस्तर समजावले आहे की मुक्ती नामामध्ये आहे आणि नाम आपणांस संतांद्वारे मिळते. संत–नामाचे भंडारी बनून येतात. ते जीवांस असली नामाशी जोडतात, हीच त्यांची जबाबदारी असते. ते परमात्म्याच्या आदेशावरून येतात आणि त्या आदेशांचेच ते पालन करतात.

***



प्रश्नोत्तरे

परम संत अजायब सिंहजी महाराजांद्वारे प्रेमींच्या प्रश्नांची उत्तरे,
७७ आर बी आश्रम, राजस्थान – १९७६

प्रेमी : मला कित्येकदा असे वाटते की मी पाखंडी आहे. मी जे काही करीत आहे, ते भीतीमुळे करीत आहे, भक्तीभावाने करीत नाही?

बाबाजी : आपल्या अंतरात दोन प्रकारच्या संवेदनांच्या लहरी (तरंग) उठतात, एका लहरीस मन तर दुसऱ्या लहरीस सतगुरूंची शक्ती चालविते. जेव्हा आपल्या अंतरात मनाची लहर उठते, तेव्हा आपण मनाच्या वशात असतो. त्यावेळी आपल्या मनात असे विचार येतात की मी फार चांगला व उच्च प्रतीचा भक्त आहे, गुरूंचा खरा शिष्य आहे, माझा ध्यान–अभ्यास फार दांडगा आहे. आपल्याला वाटते की आपण ध्यान–अभ्यास करतो, बाकीचे शिष्य काही करीत नाहीत.

जेव्हा आपल्या अंतरात आत्म्याची लहर उठते, तेव्हा आपले विचार शुद्ध बनतात व सत्य बाहेर येते आणि आपणांस आपले दोष व उणींवा दिसू लागतात की आपण जे करावयास हवे ते करीत नाही आहोत. आपण जेव्हा स्वत:स पाखंडी समजू लागतो, तेव्हा आपल्याला समजले पाहिजे की हा आपल्या आत्म्याचा आवाज आहे, जो आपल्याला सांगत असतो की आपण काय केले पाहिजे.

मन, बुद्धी, विवेक आणि अहंकार या चार शक्ती आपल्या अंतरात सदैव कार्यरत असतात. मन आपल्याला चांगले किंवा वाईट काम करण्यास विवश करते. बुद्धी आपल्याला चांगले काम करण्यास प्रेरित करते. विवेका द्वारे आपणांस कळते की आपल्या आजू–बाजूस काय होत आहे. अहंकार आपणांस ही जाणिव करून देतो की मीच सर्वकाही करणारा कर्ता आहे. या चारही शक्ती आपली दिशाभूल करतात.

आपल्या अंतरात वाईट विचार उठू लागले की आपण समजावे की मन आपल्यावर आक्रमण करीत आहे व आपणांस आपल्या मनाविरुद्ध लढण्यास सज्ज झाले पाहिजे. जेव्हा आपल्या अंतरात परमात्म्याबद्दल व ध्यान-अभ्यासा विषयी विचार येऊ लागतात तेव्हा आपण समजावे की हे विचार आपल्या गुरूंकडून येत आहेत.

प्रेमी : अधिक अन्न ग्रहण केल्याने आपणांस ध्यान व नामस्मरणास बसण्यासाठी फायदा होतो का? आपण खोल श्वास घेऊ शकतो का?

बाबाजी : प्रियजनहो! जेवढे अन्न आपण पचवू शकतो, तेवढेच अन्न आपण ग्रहण केले पाहिजे. जेवणानंतर आपणांस असे वाटता कामा नये की आपण गरजेपेक्षा अधिक जेवलो आहोत. महाराज सावन सिंहजी सांगत असत,''जेवल्यानंतर अन्न पचनासाठी काही चुर्ण खाणे हे शहाणपण नाही.''

प्रेमी : ध्यान-नामस्मरण करताना आपल्या शरीरास वेदना होतात. ध्यान-नामस्मरण करण्यासाठी आम्ही जेव्हा तुमच्या सोबत बसतो तेव्हा आमच्याबरोबर तुम्हास देखील त्या वेदना जाणवतात का? आम्हांस त्या वेदनांपासून मुक्ती मिळावी म्हणून तुम्ही आमची मदत करता का?

बाबाजी : सतगुरूंना तुमच्या वेदनांची कल्पना नाही असा तुम्ही विचारही करू नये. असा एकही क्षण नसतो, ज्याक्षणी सतगुरूंना शिष्याच्या वेदनांची जाणीव नसते. तुम्ही येथे बसून नामस्मरण करीत असलात किंवा तुमच्या घरी बसून करीत असलात याने काहीच फरक पडत नाही. सतगुरू नेहमीच तुम्हाला मदत करीत असतात आणि त्यांना सदैव तुमच्या वेदनांची जाणीव असते. आपल्या शिष्याच्या भल्यासाठी सतगुरू नेहमीच परमपिता परमात्म्याकडे प्रार्थना करीत असतात. संगतच सतगुरूंचा परिवार असतो. त्यामुळे ते संगतच्या भल्यासाठी परमात्म्याकडे सदैव प्रार्थना करीत असतात. गुरू गोविंद सिंहजी महाराज सांगतात:

सुखी बसे मेरो परिवारा, सेवक सिख सभे करतारा।

कबीर साहेब सांगतात,''जे दुसऱ्यांच्या वेदना जाणतात, त्या वेदना दूर करू शकतात, त्यांनाच सतगुरू म्हणवून घेण्याचा अधिकार असतो. जे दुसऱ्यांच्या वेदना जाणत नाहीत त्यांनी स्वत:स सतगुरू म्हणवून घेवू नये.''

अनेक सत्संगींना त्यांच्या आयुष्यामध्ये अनुभव आलेला असतो की प्रापंचिक कामे पार पाडण्यासाठी देखील सतगुरू सेवकास मदत करतात. सत्संगी अनेकदा पाहतात की सतगुरू समोर येऊन त्यास मदत करतात तर कधी पडद्याआडूनही त्यास मदत करतात. सत्संगीस, त्याने केलेल्या प्रत्येक कर्माची शिक्षा भोगावी लागत नाही. सतगुरू राजीखुषी आणि प्रेमाने त्यांच्या शिष्यांच्या कर्मांचे ओझे स्वत: उचलतात, ज्याची शिष्यास कल्पनाही नसते.

एकदा सत्संग करण्यासाठी महाराज कृपाल श्री गंगानगर येथे येणार होते. ते येण्याअगोदर काही प्रेमी सत्संगाची व्यवस्था पाहण्यासाठी आले होते. ते प्रेमी माझ्याकडे आले त्यावेळी माझ्या अंगात खूप ताप भरलेला होता. मला विचारल्याशिवाय त्या प्रेमींनी दिल्लीला महाराजजींना तार पाठविली की मला खूप ताप आहे. हे जेव्हा मला कळले तेव्हा मी त्या प्रेमींवर खूप नाराज झालो की, तुम्ही असे का केलेत? मला माहित होते की माझ्या सतगुरूंना जेव्हा माझ्या आजाराबद्दल कळेल, तेव्हा माझी कर्मं ते स्वत:वर घेतील. माझा ताप उतरला तेव्हा माझ्या लक्षात आले की महाराजजींनी माझी कर्मं स्वत:वर घेतली आहेत.

अनेक प्रेमी महाराजजी येण्याची वाट पाहत होते. तेव्हा त्या प्रेमींना मी म्हणालो,''महाराजजी आज न येता उद्या येतील.'' महाराजजींना खूप ताप आल्यामुळे त्यांना श्री गंगानगर येथे येण्याचा कार्यक्रम टाळावा लागला. तिसऱ्या दिवशी महाराजजी जेव्हा श्री गंगानगरला आले तेव्हा त्यांचा चेहरा फिका पडला होता. ते खूपच अशक्त दिसत होते. महाराजजींना मी जेव्हा एकांतामध्ये भेटलो, तेव्हा मी रडू लागलो, मी त्यांची माफी मागितली. मी

त्यांना म्हणालो, ''हे सतगुरू! तुम्ही मला माफ करा, तार मी पाठविली नव्हती. मला माहिती होते की तुम्ही माझी कर्मं स्वत:वर घ्याल. मी तर बरा आहे परंतु आपणांस आजारी अवस्थेमध्ये पाहत आहे.'' शिष्याची अशी कधीच इच्छा नसते की सतगुरूंनी त्याच्या कर्मांचे ओझे उचलावे. सतगुरूंचा भार कमी करण्यामध्येच शिष्यास आनंद होतो.

आत्म्यास जेव्हा पूर्ण सतगुरूंचे दर्शन होते, तेव्हा त्याची अनेक जन्मांच्या कर्मांपासून सुटका होते. आत्म्यास पूर्ण गुरूंद्वारा जेव्हा नामदान प्राप्त होते, सतगुरू त्याच्यावर कृपा करतात, तेव्हा अनेक पूर्वजन्मांची कर्मं नष्ट होतात. आत्म्याचा सतगुरूंवर पूर्ण विश्वास होतो की, त्याचे सतगुरू साधारण मनुष्य नसून संपूर्ण विश्वाचे रचनाकार आहेत व तेच त्यास सच्चखण्डात पोहचवतील. भाग्यशाली आत्म्यांनाच सतगुरूंचा महिमा लक्षात येतो. बुल्लेशाह सांगतात:

बुल्लया साड्ड ओथे वासा, जित्थे बहुते अन्ने।
ना साड़ी कोई कद्र पछाणे, ना सानू कोई मन्ने।।

हे जग अंध लोकांनी भरलेले आहे. खूपच कमी लोकं सतगुरूंना ओळखू शकतात. इतिहास या गोष्टीचा साक्षी आहे की कशा तऱ्हेने संसारातील लोकांनी कबीर साहेब, गुरू नानकदेवजी, गुरू अर्जुनदेवजी आणि गुरू गोविंद सिंहजींचा छळ केला. त्यालोकांकडे महात्म्यांना ओळखू शकणारे नेत्र नव्हते की या महात्म्यांचा अंतरामध्ये बसून परमात्मा कार्य करीत आहे. म्हणूनच त्यांनी कुणा महात्म्यांस फाशीवर चढविले तर कुणा महात्म्यांस तप्त तव्यावर बसविले. गुरू नानक देवजी महाराज सांगतात,''मी त्यांना अंध म्हणतो. ज्या लोकांकडे परमात्म्याने दिलेले नेत्र तर आहेत, परंतु ते परमात्म्याचा प्रकाश पाहू शकत नाहीत.''

प्रेमी : आपण आयुष्यात कोणत्या गोष्टींची स्वत: निवड करू शकतो? सर्व काही पूर्वनियोजित आहे का? नामधारी आणि बिना नामधारी यांमध्ये काय फरक आहे?

बाबाजी : सर्वकाही पूर्वनियोजितच असते. सत्संगी व्यक्तीवर जेव्हा काही दु:खं येतात, तेव्हा त्यास सर्व च्या सर्व दु:खं भोगावी लागत नाहीत. त्याच्या मस्तकावर सतगुरूंचा हात असतो. सतगुरू नेहमीच त्याचे रक्षण करीत असतात. आपण नेहमी आपल्या मनाचे म्हणणे ऐकत असतो. जेव्हा काही चांगले घडते, तेव्हा आपण म्हणतो,''हे सर्वकाही आपण केले आहे. परंतु जेव्हा काही वाईट घडते, तेव्हा त्यासाठी आपण परमात्म्यास जबाबदार धरतो.'' आपण आपल्या मनाच्या सांगण्यानुसार वागत असतो. परंतु आपण जेव्हा आपल्या आत्म्याची मनाच्या पिंजऱ्यामधून सुटका करतो तेव्हा आपणांस मन आणि आत्म्यामधील फरक लक्षात येतो.

प्रेमी : मी जेव्हा दुपारनंतर नामस्मरणासाठी बसतो, तेव्हा मला खूप अडचणी येतात.

बाबाजी : तुम्ही जगाविषयी विचार करू नका. तुमचे लक्ष ध्यान आणि नामस्मरणावर ठेवा, तुम्हास कोणतीही अडचण येणार नाही.

***

धन्य अजायब

परमसंत अजायब सिंह महाराजांच्या मधुर आठवणीतील
अहमदाबाद शहरातील कार्यक्रमाची माहीती



गुरुप्रेमी साधूसंगत,

परमसंत अजायब सिंहजी महाराजांच्या कृपेने दरवर्षीप्रमाणे यंदा देखील **अहमदाबाद** येथे **३, ४ आणि ५ जुलै २०१५** रोजी निम्नलिखित पत्त्यावर सत्संगाचा कार्यक्रम आयोजित केला गेला आहे. सर्व प्रेमी बंधु-भगिनींच्या चरणी नम्र विनंती आहे की, सत्संगासाठी येऊन संत-वचनांचा लाभ घ्यावा.

ईश्वर भवन

क्रॉस रोड (कॉमर्स कॉलेजजवळ), नवरंगपुरा, अहमदाबाद, (गुजरात)

फोन: ९९९८९ ४६२३१, ९७२५० ०५७९४ आणि ९६३८७ ५२०२०